# गुरुकृपेची उदारता

## डेव्हिड कॅटझ् यांच्याद्वारे व्याख्यान

### गुरुपौर्णिमेच्या सन्मानार्थ

श्रीगुरूंचा अनुग्रह, श्रीगुरूंची कृपा. श्रीगुरूंचे मार्गदर्शन. सद्गुरुंचे सान्निध्य. गुरुज्ञान. सद्गुरुंची करुणा. श्रीगुरुंचे दर्शन. सद्गुरुंचा प्रकाश. सद्गुरुंचे प्रेम. गुरुकृपेची उदारता अतुलनीय आहे.

शिष्याच्या जीवनाचा कायाकल्प होण्यासाठी सद्गुरूंची कृपा अत्यावश्यक असते.
कायाकल्प अर्थात् रूपांतरण.

हे समजून घ्या की, हे काही सामान्य रूपांतरण नसते. हे ते रूपांतरण आहे, जे शिष्याला अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन जाते, असत्याकडून सत्याकडे आणि मृत्युकडून अमरत्वाकडे घेऊन जाते. हे रूपांतरण म्हणजे काय हे ज्याने कोणी जाणले आहे, ज्या कोणी या रूपांतरणाचा अनुभव घेतला आहे, तो आपले उर्वरित आयुष्य श्रीगुरूंच्या वंदन-पूजनात व्यतीत करेल. आणि अशा प्रकारे गुरू-शिष्य संबंध अबाधित राहतो.

रूपांतरणाच्या या प्रक्रियेद्वारे आपल्याला ते ज्ञान प्राप्त होते, ज्यामुळे आपण असे अनुभवतो की, हे विश्व त्यापेक्षा कितीतरी अधिक जिवंत आणि सौंदर्ययुक्त आहे, की ज्याची रचना केवळ मानवीय कल्पनाशक्ती करू शकली असती. आपण ते दिव्य तेज प्रत्यक्षात पाहू शकतो, जे आपल्या अस्तित्वात आणि संपूर्ण सृष्टीत व्याप्त आहे. ते दिव्य तेज या जगात जगण्याचा नवा मार्ग आपल्याला प्रदान करते.

हा अद्भुत प्रकाश आपल्या जीवनात जसजसा व्याप्त होऊ लागतो, तसतसे त्याच्या प्रभेने आपण आश्चर्यचकित होतो. आपल्याला कुतूहल वाटते की, हा प्रकाश आपली स्वतःविषयीची आणि या जगाविषयीची समज कशा प्रकारे बदलून टाकतो. आणि मग . . . आणि मग. . . आणि मग आपण. . . *स्वतंत्र* होतो.

विचार करा : “मी स्वतंत्र आहे.”

कल्पना करा : “मी स्वतंत्र आहे.”

अनुभूती घ्या : “मी स्वतंत्र आहे.”

लक्षात ठेवा, तुमचा मूळ स्वभाव आहे, स्वतंत्रता. स्वतंत्रता तुमचा आधार व आश्रय आहे. आणि या स्वतंत्रतेचा शोध घेणे हेच या आयुष्यातील तुमचे मूळ उद्दिष्ट आहे—हेच तुमच्या *असण्याचे मूळ कारण आहे.*

याविषयी विचार करा. *स्वतंत्रता.*

ही नव्याने प्राप्त झालेली स्वतंत्रता, जिचा अनुभव आपण या रूपात घेतो की, ही मूलभूतपणे आपलीच आहे, ती श्रीगुरूंच्या करुणेमुळे उदित होते. श्रीगुरू अज्ञानाची आवरणे भेदतात—ती आवरणे, जी जन्मजन्मांतरांपासून संचित झाली आहेत. मायेच्या या आवरणांचे दूर होणे, ही एक रहस्यमय यात्रा आहे. ही गुरू-शिष्याच्या नात्यात घडणाऱ्या आंतरिक प्रक्रियेचे सार आहे. एक शिष्य या सखोल प्रक्रियेसाठी स्वतःला कशा प्रकारे तयार करतो आणि कशा प्रकारे ही प्रक्रिया समजून घेतो हे अवलंबून असते—त्याच्या चांगल्या कर्मांवर, त्याच्या इच्छाशक्तीवर, त्याच्या मुमुक्षुत्वावर म्हणजेच सत्याच्या ज्ञानप्राप्तीसाठी असलेल्या त्याच्या तीव्र अध्ययनावर, तीव्र उत्कंठेवर. आणि या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान, श्रीगुरूंची कृपा सदैव उपस्थित असते.

ही यात्रा जसजशी पुढे जात राहते, तसतसे शिष्याचे संपूर्ण अस्तित्व परिपक्व होत जाते. त्याचे चेतना रूपी क्षेत्र आणखी अधिक फलदायी होत जाते. त्यामध्ये एक नवीन व अधिक सखोल परिपक्वता येऊ लागते

आपल्या आंतरिक आणि बाह्य जगाविषयी शिष्याची समज परिपक्व होणे, हे श्रीगुरूंच्या प्रसादाचे फळ असते आणि तो प्रसाद आहे, ‘दिव्यचक्षू’ म्हणजेच दिव्यदृष्टी प्राप्त होणे.

दिव्यचक्षुरूपी हा गुरुप्रसाद आपल्याला एक उपाय प्रदान करतो, की ज्यामुळे आपल्याला जगाकडे नवीन दृष्टीने पाहता यावे आणि त्याच्या अंगभूत बहुमूल्यतेची अनुभूती घेता यावी.

आपण जसजसे स्वतःला आध्यात्मिक साधनेप्रति समर्पित करत जातो आणि परमात्म्याचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करतो, तसतसे श्रीगुरू आपले पोषण आणि मार्गदर्शन करत राहतात, जेणेकरून आपण या दिव्यदृष्टीला आपली स्वतःची करू शकू.

*कायाकल्प. स्वतंत्रता.* आपण आपल्या श्रीगुरूंचे वंदन-पूजन करू या.

***

सिद्धयोग मार्गावर, जेव्हा हा कायाकल्प होतो, हे रूपांतरण होते तेव्हा आपण आपल्या स्वतंत्रतेचा पुन्हा अनुभव घेतो, आपल्या हृदयात असे काहीतरी घटित होते, जे असाधारण असते. याला भक्ती म्हणतात. प्रेमाचा निर्झर प्रकट होऊन वाहू लागतो.

हे अशा प्रकारचे प्रेम असते, ज्यामुळे आपण स्वतःच्या त्या पद्धती बदलण्याचा प्रयत्न करतो, ज्या कल्याणकारी नसतात.

हे अशा प्रकारचे प्रेम असते, जे आपल्याला अशी प्रेरणा देते की, आपण जे काही करू ते आणखी अधिक चांगल्या प्रकारे करावे, अधिकाधिक चांगल्या प्रकारे करावे.

हे अशा प्रकारचे प्रेम असते, जे आपल्याला या गोष्टीसाठी प्रवृत्त करते की, आपण प्रत्यक्षात जे आहोत त्याप्रति सत्यनिष्ठ राहावे.

हे अशा प्रकारचे प्रेम असते, जे आपल्याला विनम्रतेच्या मार्गावर घेऊन जाते, जिथे आपण इतरांचा स्वीकार करतो आणि त्यांच्या भावनांचा व श्रद्धांचा सन्मान करतो.

हे अशा प्रकारचे प्रेम असते, जे आपल्यात अशी इच्छा जागृत करते की, आपण केवळ देत राहावे. . . देत राहावे. . . आणि *देतच राहावे* . . . हे प्रेम आपल्यात अशी इच्छा जागृत करते की, श्रीगुरूंच्या शिकवणी प्राप्त करण्यासाठी आपण इतर लोकांना मदत करावी, जेणेकरून त्या शिकवणींची पाळेमूळे लोकांच्या जीवनात दृढ व्हावीत— आणि त्याच्या मोबदल्यात त्या लोकांना आध्यात्मिक समृद्धीची अनुभूती व्हावी. अशी असते श्रीगुरूंची दृष्टी.

गुरुभक्ती तो आधार आहे ज्यावर गुरू-शिष्य संबंध आश्रित आहे. *गुरुभक्ती.*

आपण आपल्या श्रीगुरूंचे वंदन-पूजन करू या.

भारतात आठव्या शतकात होऊन गेलेले, महात्मा आदि शंकराचार्य यांनी गुरुभक्तीचा उपदेश केला. शंकराचार्य एक आत्मज्ञानी महाविभूती होते, एक आध्यात्मिक गुरू होते, ज्यांनी आपल्या उपदेशांमधून आणि शास्त्रग्रंथांवरील टीकांद्वारे वेदांच्या ज्ञानाचे सार समजावून सांगितले. हे सारे ज्ञान इतरांना प्रदान करण्यासाठी, त्यांनी आपल्या शिष्यगणांना संपूर्ण भारताच्या चारही दिशांना पाठविले —उत्तर, दक्षिण, पूर्व आणि पश्चिमेला. साधकगण श्रीशंकराचार्यांच्या शिकवणींचा सन्मान आजतागायत करतात, त्यांचे अध्ययन करतात आणि त्यांपासून लाभ मिळवतात.

आपली रचना, ‘गुरोरष्टकम्’मध्ये श्रीशंकराचार्य म्हणतात,

तुम्हाला वेद आणि त्यांची सहा अंगे,
शास्त्रग्रंथांतील विद्या इत्यादी कदाचित मुखोद्गत असतील;
कदाचित तुमच्यात कवित्व इत्यादींची साहित्यिक प्रतिभा असेल
आणि तुम्ही सुंदर गद्यांची व पद्यांची रचना करत असाल,
पण जर तुमचे मन श्रीगुरूंच्या चरणकमलांविषयी अनुरक्त नसेल,
तर काय, तर काय, तर काय?

या श्लोकामध्ये श्रीशंकराचार्य गुरुभक्तीचा महिमा गातात, की गुरुभक्ती असणे अत्यावश्यक आहे— या जीवनात खऱ्या अर्थाने तृप्तीची प्राप्ती करण्यासाठी ती अनिवार्य आहे. आपल्या मनाला ‘श्रीगुरूंच्या चरणकमलांवर’ एकाग्र ठेवण्याच्या रूपात गुरुभक्ती दर्शवली जाते. भारतीय शास्त्रग्रंथांमध्ये गुरुचरणांना ‘चरणकमल’ म्हटले गेले आहे. कमळ, हे परमोच्च ज्ञानाचे प्रतीकदेखील आहे. शास्त्रग्रंथ असेही म्हणतात की, सद्गुरूंचे चरण संपूर्ण आध्यात्मिक ज्ञानाचे भांडार आहे आणि समस्त आशीर्वादांचा स्रोत आहे. *चरणकमल.*

*कायाकल्प. स्वतंत्रता. गुरुभक्ती.* आपण आपल्या श्रीगुरूंचे वंदन-पूजन करू या.

***

आता मी तुमचे लक्ष संस्कृत भाषेतील आणखी एका सुंदर शब्दाकडे आणू इच्छितो. तुम्हाला तुमच्या हृदयात जेव्हा अपार भक्तीची अनुभूती होत असते, तेव्हा तुमची स्वाभाविक इच्छा काय असते?

*अर्पण.*

अर्पणचा अर्थ आहे, भेट किंवा उपहार. त्याचप्रमाणे, अर्पित करण्याचे वा देण्याचे कृत्य यालादेखील अर्पण असे म्हटले जाते. संस्कृत भाषेमध्ये हा शब्द ज्या संकल्पनेशी निगडित आहे, ती आहे, परतफेड करणे किंवा बदल्यात काहीतरी देणे—आणि एका उद्देशाने देणे. म्हणून आपण अर्पण या शब्दाला अशा प्रकारे जाणून घेऊ शकतो की, ती एक अशी भेट असते, जी स्पष्ट उद्देशासह व दृढ वचनबद्धतेसह दिली जाते.

अर्पण, हे भारतातील प्रत्येक पूजा-विधीतील एक अभिन्न अंग असते. अर्पण हे सर्व पूजांचे मूलभूत अंग आहे आणि हे हवन व यज्ञ यांचा एक अत्यंत महत्त्वपूर्ण भाग आहे. या अनुष्ठानांच्या समयी ब्राह्मण पुजारी विभिन्न रूपांनी अर्पण करत असतात—पुष्प अर्पणम् म्हणजे फूलांचे अर्पण; फल अर्पणम् म्हणजे फळांचे अर्पण; दीप अर्पणम् अर्थात प्रकाशाचे अर्पण; नैवेद्य अर्पणम् अर्थात भोजनाचे

अर्पण; नमस्कार अर्पणम्, नमनाचे अर्पण; मंत्र अर्पणम्, पावन मत्रांचे अर्पण. अशा प्रकारे आणि इतर अनेक प्रकारांनीही. अर्पण करण्याच्या कितीतरी पद्धती आहेत.

या सर्व पवित्र अर्पणांच्या केंद्रस्थानी आहे, आपली ती आंतरिक स्थिती, आपला तो आंतरिक भाव की, जो अर्पणाला खरा अर्थ प्रदान करतो, जो अर्पण करण्यामागील निहित प्रेरणा आहे आणि ज्यामुळे अर्पण शक्तीने व्याप्त असते. अर्पणाचा अर्थ आहे भगवंताप्रति तसेच आपले श्रीगुरू ज्यांच्यावर आपले प्रेम आहे आणि ज्यांच्यावर आपला विश्वास आहे, त्यांच्याप्रति आपले सर्वोत्कृष्ट अर्पित करणे. देण्याच्या आपल्या सर्वोच्च क्षमतेची अभिव्यक्ती आहे अर्पण, ज्यामध्ये आपण देण्याच्या व घेण्याच्या नैसर्गिक चक्रांचा एक भाग बनतो.

ऋग्वेदाची शिकवण आहे की, हे ब्रह्मांड अर्पणामुळेच आपल्या स्थानी टिकून आहे; अर्पणाच्या माध्यमातूनच या ब्रह्मांडामध्ये दैवी नियम किंवा विधीविधानाचे प्राकट्य होत असते आणि यामुळेच त्याचा प्रतिपाळही होत असतो, या दैवी नियमाला 'ऋत' असे संबोधले जाते. आपण सृष्टीच्या प्रत्येक स्तरावर हे पाहू शकतो—या पृथ्वी ग्रहापासून ते त्यातील समस्त सूक्ष्म लोकांच्या व अणु-परमाणूंच्या स्तरापर्यंत.

उदाहरणार्थ, एका बीजकोशातून नवजीवनाचा अंकुर तेव्हाच फुटतो, जेव्हा . . . जेव्हा काय? जेव्हा तो बीजकोश आपल्या बीजांना त्या धरणीप्रति अर्पण करतो, ज्या धरणीतून त्याची उत्पत्ती झाली होती. आकाशाची दारे उघडतात आणि मग त्यातून सागरांना, नद्यांना, सरोवरांना आणि झऱ्यांना त्यांची जलप्राप्ती होते. आणि मग परत फिरून, बाष्पापासून ढग बनून ते पुन्हा स्वतःला आकाशाप्रति अर्पित करून टाकतात.

निरंतरतेने, अटळतेने देण्याची व घेण्याची ही नैसर्गिक चक्रे चालू राहतात. मानव असण्याच्या नात्याने—पृथ्वीच्या प्रचुरतेचे एक उपभोक्ता असण्याच्या नात्यानेदेखील व त्याचबरोबर त्याच्या क्षेमकुशलाचे संरक्षक असण्याच्या नात्याने आणि स्वतःदेखील निसर्गाचा एक भाग असण्याच्या नात्याने, आपण हा निर्णय घेऊ शकतो की, आपण देण्याच्या व घेण्याच्या या नैसर्गिक चक्रांसमवेत सामंजस्य राखायला हवे.

याच जागरूकतेसह, याच बोधासह, या जगातील आपल्या स्थानाच्या आनंदपूर्ण स्वीकृतीसह आणि त्याच्याप्रति असलेल्या आपल्या वचनबद्धतेसह, आपण आपल्या श्रीगुरूंचे वंदन-पूजन करू या.

***

आपण स्मरण करतो,

अनुग्रहाचे अर्थातच श्रीगुरूंच्या कृपेचे,
कायाकल्पाचे अर्थात आपल्या संपूर्ण अस्तित्वाच्या रूपांतरणाचे,
स्वतंत्रता अर्थात त्या स्वतंत्रतेचे जिची प्राप्ती आपल्याला रूपांतरणाद्वारे पुन्हा होते.
गुरुभक्तीचे अर्थात् श्रीगुरूंप्रति असलेल्या त्या भक्तीभावाचे जो आपल्या हृदयीच्या निर्झरातून उदित होतो, आणि
आपण स्मरण करतो, अर्पणाचे.

आपण आपल्या श्रीगुरूंचे वंदन-पूजन करू या.

प्रत्येक वेळी मी जेव्हा ‘सद्‌गुरुनाथ महाराज की जय’ असे म्हणतो, तेव्हा मला असे जाणवते की, मी श्रीगुरुमाईंचे, माझ्या श्रीगुरूंचे वंदन-पूजन करतो आहे, मी त्यांना माझ्या हृदयात विराजमान असलेल्या पाहतो आणि मी माझा कृतज्ञताभाव व प्रणाम त्यांना अर्पित करतो.

हिंदी भाषेतील हे शब्द सिद्धयोग मार्गावर अत्यंत महत्त्वपूर्ण आणि अनमोल आहेत; ते असा अर्थ व्यक्त करतात की, श्रीसद्‌गुरुंचा जयजयकार असो!

आता, आपण सगळे मिळून—महान स्वतंत्रतेसह आणि आनंदासह—हे शब्द गाऊन आपल्या परमप्रिय श्रीगुरूंचे वंदन-पूजन करू या—सद्‌गुरुनाथ महाराज की जय!

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.